अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिंद क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र





"होळी व धुलिवंदनच्या हार्दिक शुभेच्छा !"


वर्ष ४३ वे

अंक ३ रा

१० मार्च २०२२

किंमत १ रूपया

### चित्तपावन मित्र मंडळ

## "स्नेहबंध मैत्रिणींचा"

**मैत्रिणींनो....**

खूप दिवसानी आपण सगळ्या जणी भेटण्याचा योग येतो आहे... आता करोना परिस्थिती बरीच निवळली आहे. सगळे व्यवहार सुरू झाले आहेत. चांगली गोष्ट आहे.

आपण देखील आपले ''चित्तपावन ब्राह्मण संघाचे सर्व कार्यक्रम व महिला मंडळाचे ही सर्व'' कार्यक्रम सुरू करीत आहोत.

तारीख २६/०३/२०२२ रोजी चौथ्या शनिवारी आपण ''स्नेहबंध मैत्रिणींचा'' या आपल्या मासिक सभेसाठी एकत्र जमणार आहोत.

खूप दिवसांनी जमणार आहोत, याचा आनंद सगळ्यांनाच आहे. म्हणून छान नटून, सजून यायचे आहे...

आपण या वेळी एक गमतीदार स्पर्धा घेणार आहोत.

''एका रंगात रंगले मी''

मैत्रिणींनी आवडत्या एकाच रंगाचा शृंगार करायचा आहे...

वेशभूषा...., साडी...., ड्रेस...., अलंकार, फुले आणि इतर...

जास्तीत जास्त एकच रंग वापरून शृंगार केलेल्या विजेत्या मैत्रिणीला छोटेसे बक्षीस पण दिले जाईल.

आणखीही दोन स्पर्धा घेण्यात येणार आहेत. पण त्या आयत्या वेळी जाहीर करण्यात येतील. थोडी गंमत सगळ्या जणी मिळून करुया.

**मैत्रिणींनो शनिवारी २६ मार्च रोजी पाच वाजता सगळ्या जणी नक्की या... भेटूच...**

**ठिकाण व वेळ :- गद्रे मंगल कार्यालय येथे पाच वाजता जमूया.**

## स्वातंत्र्य वीर
## विनायक दामोदर सावरकर



***पुस्तक पडून आहे***
***यापेक्षा***
***वाचून वाचून फाटून जाते***
***ही कागाळी***
***मला फार आवडते.***

**- स्वा. वीर सावरकर**

# गायत्री मंत्र सर्वाक्षर महिमा

आपल्या शरीरात असंख्य नाड्यांचे जाळे पसरलेले आहे. यातील काही नाड्या जुळल्या असता त्यांना ''ग्रंथी'' म्हणतात. उपयोगात श्रद्धा / निष्ठा असलेल्या साधकांच्या मंत्रोच्चाराने या ग्रंथी जागृत होऊन त्यातील सुप्त शक्तींचा प्रादुर्भाव होतो.

''ॐ'' या अक्षराचा उच्चार केला असता मस्तकातील भाग प्रभावित होतो.

''भू:'' या अक्षराच्या उच्चाराने उजव्या डोळ्यावरील चार अंगुलीचा कपाळाचा भाग जागृत होतो.

''भूव:'' च्या उच्चारणाने मानवाच्या भूकूटीच्या वरील तीन अंगुलीचा भाग प्रभावित होतो.

''स्व:'' या अक्षराच्या उच्चाराने डाव्या डोळ्यावरील कपाळाचा चार अंगुली इतका भाग जागृत होतो.

''तत्'' च्या उच्चाराने आज्ञा चक्रामध्ये असलेली ''तापिनी'' ग्रंथीतील सुप्त असलेली 'साफल्य' शक्ती जागृत होते.

''स'' च्या उच्चाराने डाव्या डोळ्यातील सफलता नावाच्या ग्रंथीमध्ये सुप्त रुपाने असलेली 'पराक्रम' शक्ती प्रभावित होते.

''वि'' चे उच्चारण केले असता डाव्या डोळ्यामधील 'विश्व' ग्रंथीमध्ये स्थित असलेली.... शक्ती जागृत होते.

''तू'' या अक्षराच्या उच्चाराने डाव्या कानात असलेल्या ''तुष्टी'' नावाच्या ग्रंथीतील 'मंगळ' शक्ती प्रभावित होते.

''र्व'' या अक्षराच्या उच्चाराने उजव्या कानात स्थित असलेल्या 'वरदा' ग्रंथीतील 'योग'.... शक्ती सिद्ध होते.

''रे'' चा उच्चार केल असता नासिकेच्या मुळाशी स्थित असलेल्या 'रेवती' ग्रंथीतील 'प्रेम' शक्तीची जागृती होते.

''णि'' च्या उच्चाराने वरील ओठावर असलेल्या 'सूक्ष्म' ग्रंथीतील सुप्त शक्ती 'धन' जागृत होते.

''यं'' या अक्षराच्या उच्चाराने आपल्या खालच्या ओठावर असलेल्या 'ज्ञान' ग्रंथीतील 'तेज' शक्तीची सिद्धी होते.

''भ'' या अक्षर समुदायाच्या उच्चाराने कंठात असलेल्या 'भग' ग्रंथीतील 'रक्षणा' शक्ती जागृत होते.

''र्गो'' चा उच्चार केला असता कंठकूपात स्थित असलेल्या ''गोमती'' नावाच्या ग्रंथीतील 'बुद्धी' शक्तीची सिद्धी होते.

''दे'' च्या उच्चाराने डाव्या छातीच्या वरच्या भागात असलेल्या ''वराही'' ग्रंथीतील 'निष्ठा' शक्तीची सिद्धी होते.

''व'' च्या उच्चाराने उजव्या छातीच्या वरील भागात असलेल्या 'देविका' ग्रंथीतील 'निष्ठा' शक्तीची सिद्धी होते.

''स्य'' याच्या उच्चाराने पोटाच्या वरील बाजूस (ज्या ठिकाणी बरगड्या जुळतात) सिंहिणी नावाची ग्रंथी असते. या ग्रंथीतील 'धारणा' शक्ती प्रभावित होते.

''धी'' च्या उच्चाराने यकृतात असलेल्या 'ध्यान' ग्रंथीतील 'प्राणशक्ती' सिद्ध होते.

''म'' या अक्षराच्या उच्चाराने आपल्या 'प्लिहा' मध्ये असलेल्या 'मर्यादा' ग्रंथीतील होते.

''हि'' च्या उच्चाराने नाभीमधील 'स्फूट' ग्रंथीतील 'तपो' शक्ती सिद्ध होते.

''धी'' या अक्षराच्या उच्चाराने पाठीच्या कण्याच्या खालील भागात असलेल्या 'मेघा' ग्रंथीतील 'दूरदर्शिता' शक्तीची सिद्धी होते.

''यो'' च्या उच्चाराने डाव्या भुजेत स्थित असलेल्या 'योगमाया' ग्रंथीतील 'अंतर्निहित' शक्ती जागृत होते.

''न:'' या अक्षराच्या उच्चाराने उजव्या कोपरामध्ये असलेल्या 'धारिणी' ग्रंथीतील 'सरसता' शक्तीची सिद्धी होते.

''प्र'' या अक्षराच्या उच्चाराने डाव्या कोपरात असलेल्या 'प्रभव' ग्रंथीतील 'आदर्श' नावाच्या शक्तीची जागृती होते.

''चो'' या अक्षराच्या उच्चाराने डाव्या व उजव्या मनगटात स्थित असलेल्या 'उष्मा' ग्रंथीतील 'साहस' शक्तीची जागृती होते.

''द'' या अक्षराच्या उच्चाराने उजव्या तळहातावर असलेल्या 'दृश्य' नावांच्या ग्रंथीतील 'विवेक' शक्तीची जागृती होते.

''यात'' या अक्षर द्वयांच्या उच्चाराने डाव्या तळहातावरील 'निरंजन' ग्रंथीतील 'सेवा' शक्ती सिद्ध होते.

– संकलक

**श्री. मोरेश्वर धुंडीराम फडके**

आपल्याला दुसऱ्याचे बोलणे समजत नाही का?
होय....! तर आपल्या कानाच्या तपासणीसाठी...



अदृश्य श्रवणयंत्र

एक उपयुक्त दागिना...!

अनेक नावाजलेल्या कंपन्यांचे श्रवणयंत्र उपलब्ध

अनुभवी तज्ज्ञांचे मार्गदर्शन

मंडळाच्या आजीवन सभासदांसाठी **विशेष सुट**

संपर्क : डॉ. श्री व सौ. वैद्य
**संवाद स्पीच ॲण्ड हिअरिंग क्लिनिक**
फ्लॅट नं. १, पहिला मजला, प्रधान पार्क, एम.जी. रोड, नाशिक.
Ph.: 2318333, Mob : 9422269394

**शाखा :** हेरिटेज अपार्टमेंट, म्हसोबा मंदिराच्या समोर, VLCC जवळ, जेहान सर्कल, गंगापूर रोड, नाशिक

* अटी लागू

# अखंड नंदादीप

भारतीय संस्कृती सांगते 'तमसो मा ज्योर्तिगमय' अंध:करातून प्रकाशाकडे जा. पण कोणत्याही प्रकाशाच्या (दिव्याची) ज्योत तेवणे यात विशेषत्व आहे. कोणतीही वस्तू नेहमी आपल्या स्त्रोताकडे जाणार हा निसर्ग नियम. प्रकाशाच्या मूळ स्त्रोत 'सवितृ' निसर्ग नियमाप्रमाणे, दिवा कोणत्याही प्रकारचा असो., (कंदील, चिमणी, समई, पणती, निरांजन) त्यांची ज्योत नेहमी उर्ध्वगामीच असणार.

फक्त भारतीय संस्कृतीतच दीप प्रज्वलित करतात असे नसून ख्रिश्चन, पारसी, बौद्ध सर्वच पंथांमध्ये दीप अथवा मेणबत्ती प्रज्वलित करतात. मग भारतीय संस्कृतीचे श्रेष्ठत्व काय? इतर धर्मीय दिवा मालवतात, मेणबत्ती विझवतात. तर भारतीय दिवा विझविणे अशुभ मानतात. स्वत: कधीही विझवणार नाहीत. पुजेत सुद्धा दिव्याची प्रार्थना करतात. 'कार्य संपूर्ण होईपर्यंत स्थिर रहा' हे आमचे श्रेष्ठत्व.

भारतीय संस्कृती भौतिक, मानसिक, शारीरिक या तिन्ही गोष्टी विचारात घेते. नवरात्रात 'घटस्थापनेने' भौतिक विचार साधला, ओटी भरण्याच्या प्रथेतून शारीरिक व आरोग्याचा विचार केला, राहिलेला मानसिक विचार अखंड दीप प्रज्वलनात आहे.

पूर्वी तेल ही संकल्पनाच नव्हती. साजूक तूप हाच पदार्थ दिव्यात वापरला जाई. कापसाची अखंड वात, साजूक तूप हे दिव्यात वापरत. तूप हा पदार्थ जनावरांपासून मिळतो. दुधापासून तुपापर्यंतची प्रक्रिया सर्वांना ज्ञात आहे. आपले मन त्रिगुणी आहे. तमोगुण म्हणजे मला मिळाले नाही तरी चालेल पण दुसऱ्याला मिळू देणार नाही.

'भिक्षुक्ते भिक्षुकं दृष्वा श्वानवत गुरगुरायते' म्हणजेच जनावर गाय, म्हैस, तमो गुणींपासून मिळणारा पदार्थ

तमोगुणीच, म्हणून तूप तमोगुणाचे प्रतीक, तर कापसाची वात म्हणजे रजोगुण. 'वृक्षाची सावली' दुसऱ्याला मिळो न मिळो, मला मिळाली पाहिजे हा रजोगुण. वृक्षाची मुळे पाण्याच्या शोधात खोल खोल जातात हा रजोगुण. कापसापासून बनवलेली वात हे रजोगुणाचे प्रतिकच आहे.

अखंडपणे वात व तूप यांचे ज्वलन म्हणजेच तमोगुण – रजोगुण यांचा संहार, गीतेचा सतरावा अध्याय सांगतो की, प्रत्येक गोष्ट त्रिगुणात्मक असते. तमोगुणी तूप – रजोगुणी वात जाळण्याने सत्वगुणी उर्ध्वगामी ज्योत तेवते, बामानवा तमोगुण व रजोगुण नष्ट करून सत्वगुण वृद्धीने मानसिकदृष्ट्या उर्ध्वगामी हो, हा अखंड नंदादीपाचा संदेश आहे.

इतर धर्मीय मेणबत्ती विझवतात, विझवलेली वस्तू पुन्हा पेटवता येते पण रक्षा झालेली वस्तू परत प्रज्वलित होऊच शकत नाही. म्हणून तमोगुणी तूप व रजोगुणी वात अखंड पेटत ठेवणे हा अखंड नंदादिपाचा संदेश.

– संकलक
**श्री. मोरेश्वर धुंडीराम फडके**

**संस्थेच्या सुमारे ३००० सभासदांकडे म्हणजेच किमान १०,००० वाचकांपर्यंत पोहोचणारे.**
**मासिक**
**'चित्तपावन मित्र'**
म्हणजे जाहिरातीचा संदेश देणारे उत्तम माध्यम

## ❊ लेखकांना सूचना ❊

प्रत्येकाच्या आयुष्यात असे काही अनुभव असतात की ज्याचा उपयोग इतरांना पुढील पाऊले टाकताना निश्चितच मार्गदर्शक ठरू शकतो. तरी आपल्या आठवणी, संचित किंवा अनुभव जरूर लिहून पाठवावेत. मात्र मजकूर थोडक्यात लिहिलेला असावा.

# ❊ शिव-अर्चना ❊

**(महाशिवरात्री निमित्ताने)**

महाशिवरात्रीची अति पावन पर्वणी
भाव पूजा वाहिली, शिवशंकर चरणी
देवांचा हा देव महेश्वर शंकर
कैलास पती, गौरी हर, गंगाधर
पहाटेच्या प्रहरी, ध्यावे पंचानना
अर्पावे महादेवा, पंचामृत स्नाना
शुद्ध जलाचे स्नान, सदाशिवाला
गंध, हरिद्राकुंकूम वहावे शंकराला
धवल फुले, बिल्वदले आवड देवाला
धूपदीप, नैवेद्य कापूरही आरतीला
भक्तिभावाचा विडा, चंद्रशेखराला
हृदयसिंहासनी, वसवू विश्वेशाला
पावन शिवनाम, सर्वात्मका, सर्वेशा
जग विशाल, व्यापक ब्रह्मांडधीशा
भवचिंताहर, सुंदर, कर्पूरगौरा
जिवाशिवाचे मीलन व्हावे सुखसागरा
हरहर शंकर, भवानी शंकर
तनामनातून नाम निरंतर
सो ऽ हं सो ऽ हं अंतरात प्रतिसाद
ज्योतिर्मय होवो, शिवमंगल नाद !

**– सौ. सायली सहस्त्रबुद्धे,**
रविवार कारंजा, नाशिक.

## ❊ संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन ❊



आपल्या संस्थेचे सभासद श्री. अरुण भालचंद्र भिडे ह्यांची कन्या **कु. चैत्राली अरुण भिडे हिने डिसेंबर २०२१ मध्ये झालेल्या CA Final च्या परीक्षेत यश मिळवले.** चैत्रालीने तिची आर्टिकलशिप Phatak Joshi & Co ह्या CA Firm मधून पूर्ण केली होती व तिथे तिला CA Sandeep Phatak आणि CA Vidyasagar Joshi ह्यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेच्या वतीने चैत्रालीचे मन:पूर्वक अभिनंदन.

## चित्तपावन ब्राह्मण संघ - वधू यादी

| अ.क्र. | नाव पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| ७. | **कु. शिवानी मोरेश्वर पाटणकर**<br>इंडियन गॅस एजन्सी ऑफिससमोर, तुमसर रोड, कटंगी, बालाघाट, मध्य प्रदेश - ४८१ ४४५.<br>फोन : ४९१-७७७१०४६८४७<br>मो. : ९३४०४५२३५९. | ११/१२/१९९६ | शांडिल्य | ५'.३'' | M.Tech (Final) IIT Khadgapur | १२,०००/- (स्कॉलरशिप) |
| ८. | **कु. वृषाली गिरीष गद्रे**<br>गद्रे वाडा, गांधी चौक, टिमारनी-हरदा, मध्य प्रदेश - ४६१ २२८.<br>मो. : ९४२४४७१०५४. | ०६/०७/१९९१ | कौशिक | ५'.४'' | MBBS | ३५,०००/- |

## चित्तपावन ब्राह्मण संघ - वर यादी

| अ.क्र. | नाव पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| २१. | **मंदार श्रीधर पुजारी**<br>अ-५, ड्रीम घरकुल को-ऑप. सोसायटी, शिवाजी नगर, जेलरोड, नाशिकरोड - ४२२ १०१.<br>मो. : ९४०५१५७६१६. | ३०/०१/१९९४ | भारद्वाज | ५'.५'' | B.E. (Mech) | ५-६ लाख/- वार्षिक |
| २२. | **सागर अनिल कुलकर्णी**<br>अ-२, आराधना सोसायटी, आदर्शनगर, कलावती माता मंदिराजवळ, रामवाडी, नाशिक - ४२२ ००३.<br>मो. : ९५७९०५६१५९. | १३/१२/१९८९ | भारद्वाज | ५'.९'' | MBA (Finance) नोकरी कॉसमॉस बँकेत | २५,०००/- |
| २३. | **प्रतिक राजीव दिवेकर**<br>प्लॉट नं. १९१, स्वप्न बंगला, कामठवाडा, खुटवडनगर, नाशिक - ४२२ ००८.<br>मो. : ९८२२०९३७७६. | १०/०४/१९९४ | वशिष्ठ | ५'.९'' | B.Sc. Hotel Manage-ment | NSD - 2800 १,४०,०००/- मासिक |
| २४. | **मोहित दिवाकर सोमण**<br>१२०१, त्रिरत्नदिप को-ऑप. हौ. सो., केळकर कॉलेज जवळ/मागे, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०० ०८१. मो. : ९९६९९८२५०७. | ०४/१०/१९९२ | शांडिल्य | ६'.०'' | B.Com MBA PGDM | २०,०००/- |
| २५. | **निखिल श्रीराम जोशी**<br>फ्लॅट नं. बी-०६, हरिनिवास सोसायटी, कालिका माता मंदिरामागे, नाशिक - ४२२ ००२.<br>मो. : ९४०३८५३८५३. | १५/०९/१९८६ | शांडिल्य | ५'.५'' | B.Com | १०,०००/- |

निवासी, व्यापारी, औद्योगिक संकुल बांधकाम,
प्लॉट डेव्हलपमेंट यातील विश्वसनीय नाव

मिहिर कन्स्ट्रक्शन

सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर

**ऑफिस** : २, प्रसाद रेसिडेन्सी, माणेकशा नगर,
रत्नपारखी हॉस्पिटलजवळ, द्वारका, नाशिक.
फोन : २५९०७५४

**सी. व्ही. रानडे,** बी.ई. (सिव्हिल)

**मोबाईल** : ०९४२२२४६८७८
**ईमेल :** cvranade@gmail.com

ऋषभ संगीत

**मेंडोलिन ह्या तंतुवाद्यावर शास्त्रीय, उपशास्त्रीय आणि सिने संगीत वाजवायला शिका !**
**वय वर्षे १० ते ७०**
**पुरुष व स्त्रियांसाठी वेगवेगळ्या बॅचेस.**
**मेंडोलिन संगीत क्लास.**
**--- तसेच ---**
**आपल्याकडील सर्व कार्यक्रम मेंडोलिन वाद्य संगीतावर साजरे करा, स्वत: आनंद घ्या आणि इतरांना आनंद द्या !**

* संपर्क *
**श्री. शरद जोशी**
(बी. ई. सिव्हिल आणि संगीत विशारद मेंडोलिन)
**तसेच सिने मुझिशियन असोसिएशन, मुंबईचे आजीव सभासद.**
**फोन : ९४२२७६९४९२**





## * संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन *

### डॉ. माधुरी कानिटकरांना सेना पदक



मुंबई : प्रजासत्ताक दिननिमित्ताने घोषित संरक्षण दलांच्या पदकांमध्ये १३ मराठी अधिकारी - सैनिकांचा समावेश आहे. त्यामध्ये विविध सेवा पदकांसह शौर्य पदकांचाही समावेश असून भूदलाच्या माजी वैद्यकिय प्रमुख राहिलेल्या व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू लेफ्टनंट जनरल (निवृत्त) **डॉ. माधुरी कानिटकर** यांनाही संरक्षण दलाचे पदक घोषित झाले आहे.



आपल्या संस्थेचे सभासद श्री. अशोक डोंगरे यांचा मुलगा **कु. आदित्य डोंगरे** याने डिसेंबर २०२१ मध्ये घेण्यात आलेल्या **सी.ए. परीक्षेत यश संपादन केले.**

## * सामुहिक व्रतबंध *

**चित्तपावन ब्राह्मण संघ,** नाशिक संस्थेतर्फे सामुदायिक व्रतबंध सोहळा वैशाख शु. ४, शके १९४४, **गुरूवार, दि. ५ मे २०२२ रोजी, सकाळी ११.२६ वाजता** आयोजित करण्यात आता आहे. **व्रतबंध सोहळा संस्थेच्या काका गद्रे मंगल कार्यालयात, गोळे कॉलनी, नाशिक - ४२२ ००२** या ठिकाणी होईल.

**अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी संस्थेच्या 'काका गद्रे मंगल कार्यालयात' कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. सोय सर्वशाखीय ज्ञातीबांधवांसाठी आहे.**

श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था व टकले बंधू यांच्या संयुक्त विद्यमाने

# सुवर्ण संचय समृद्धी योजना



बघता बघता वर्ष-दोन वर्षावर मुला मुलींचं लग्न येऊन ठेपलं आहे!
गुंतवणुकीचा उत्तम व खात्रीशीर पर्याय शोधत आहात ?
सोने खरेदी करायचे आहे? शेअर मार्केट धक्के देतंय?
पण महागाई व वाढत्या भावामुळे शक्य होत नाहिये?

**थांबा, काळजी करू नका, आपली ही काळजी दूर झाली आहे.**

तुमच्या सोयीने हवे तेवढे सोने आजच खरेदी करा. ते पण सोन्याच्या आजच्या भावाच्या फक्त २५% रक्कम भरून. उर्वरित रकमेची सुलभ मासिक हप्त्यांमध्ये एका वर्षात परतफेड करा. लग्नात लागणारी अपरिहार्य गोष्ट किंवा वर्षानुवर्षांपासून सिद्ध झालेला उत्तम गुंतवणुकीचा पर्याय म्हणून देखील सोने हाच पर्याय आहे.

**आमचे ध्येय... “तुमची धनसमृद्धी”**

अधिक माहितीसाठी आजच संपर्क करा.

**श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था**
फोन : (०२५३) २३१३७०९/ ९१६८४२६८८८

**टकले बंधू, सराफ बाजार**
फोन : ०२५३-२५९४१५४, २५९६६५४, २५९९०५४

**विचार कसला करताय, येताय ना मग !**



चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व प्रकाशक श्री.विजय राजाराम साने, यांनी मीरा एंटरप्राईजेस, २, जयश्री अपार्टमेंट, ठाकरे बंगला, गंगापूर रोड, नाशिक- २ येथे छापून काका गद्रे मंगल कार्यालय, गोळे कॉलनी, नाशिक-४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

**गद्रे मंगल कार्यालय, फोन : ०२५३ - २५७६२४१**


प्रति, ______________________

______________________

______________________


**संस्थेची वेबसाईट :-**

- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://facebook.com/nasikchitpavan
- Website : www.nasikchitpavan.org
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://youtube.com/user/nasikchitpavan



या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. ‘चित्तपावन मित्र’ च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.



RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O मधून वितरित केला जातो.